# मिरा भाईदर महानगरपालिका

**मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा दि. ०३/०८/२०२२ रोजी आयोजित केली आहे. सदर सभेकरीता मा. सदस्यांचे खालीलप्रमाणे प्रश्न आलेले आहेत.**

<table>
<tr><th>प्रश्न</th><th></th><th>उत्तर</th></tr>
<tr><td>४२. श्री. अनिल दि. सावंत मा. सदस्य यांनी दि. ०१/०१/२०२२ रोजी विचारलेला प्रश्न.</td><td></td><td></td></tr>
<tr><td>१) शहरात एकूण किती सार्वजनिक उद्याने व बगीचा यांची मनपा देखभाल करते?</td><td></td><td>मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील एकुण ७५ उद्याने, १२ मैदाने, ११ स्मशाने व १९ दुभाजके यांची निगा व देखभाल ठेकेदारामार्फत करण्यात येते.</td></tr>
<tr><td>अ) सदर देखभाल व दुरुस्ती कामाचा ठेका मनपाने कधी, कोणाला व कितीला दिलेला आहे?</td><td></td><td>सदर उद्याने, मैदाने, स्मशाने व दुभाजके यांची २ वर्ष कालावधी करीता निगा व देखभाल करणे कामाचा ठेका मे. निसर्ग लॅण्डस्केप सर्व्हिसेस या कंपनीला जा.क्र. मनपा/ वृ.प्रा./ मिरारोड/ २०/ २०२१-२२ दि.१२/०४/२०२१ अन्वये रु.२६,३२,६३,६७३/- देण्यात आलेला आहे.</td></tr>
<tr><td>ब) सदर कामाच्या ठेक्यामध्ये कोणत्या कामांचा अंतर्भाव आहे?</td><td></td><td>सदर कामाच्या ठेक्यामध्ये मजुरा मार्फत दैनंदिन साफसफाई करणे, पाणी देणे, शोभिवंत झाडांची छाटणी / आकार देणे, लालमाती, शेणखत टाकणे, शोभिवंत झाडे खराब झाल्यास नव्याने लागवड करणे. इत्यादी कामांचा अंतर्भाव आहे.</td></tr>
<tr><td>क) कामामध्ये कसूर केल्या प्रकरणी सदर ठेकेदारावर कोणती कारवाई करण्यात आली?</td><td></td><td>निरंक</td></tr>
<tr><td>४३. श्री. अनिल दि. सावंत मा. सदस्य यांनी दि. ०१/०१/२०२२ रोजी विचारलेला प्रश्न.</td><td></td><td></td></tr>
<tr><td>१) शहरामध्ये किती गॅरेजेस आहेत त्यामध्ये अधिकृत किती व अनधिकृत किती?</td><td></td><td>
<table>
<tr><th>प्रभाग क्र.१</th><th>प्रभाग क्र.२</th><th>प्रभाग क्र.३</th><th>प्रभाग क्र.४</th><th>प्रभाग क्र.५</th><th>प्रभाग क्र.६</th><th>एकुण</th></tr>
<tr><td>पक्या इमारतीतील - ०५,</td><td>पक्या इमारतीतील - २५,</td><td>पक्या इमारतीतील - ३५,</td><td>पक्या इमारतीतील - ४५,</td><td>पक्या इमारतीतील - १९,</td><td>पक्या इमारतीतील - ३२,</td><td>१६१</td></tr>
<tr><td>मोकळ्या जागेतील- ००</td><td>मोकळ्या जागेतील- ००</td><td>मोकळ्या जागेतील- ००</td><td>मोकळ्या जागेतील- ३३</td><td>मोकळ्या जागेतील- ०२</td><td>मोकळ्या जागेतील- ५६</td><td>९१</td></tr>
</table>
</td></tr>
<tr><td>अ) शहरामध्ये किती कार वॉशिंग सेंटर आहेत त्यामध्ये अधिकृत किती व अनधिकृत किती?</td><td></td><td>
<table>
<tr><th>प्रभाग क्र.१</th><th>प्रभाग क्र.२</th><th>प्रभाग क्र.३</th><th>प्रभाग क्र.४</th><th>प्रभाग क्र.५</th><th>प्रभाग क्र.६</th><th>एकुण</th></tr>
<tr><td>पक्या इमारतीतील - ०२,</td><td>पक्या इमारतीतील - ०३,</td><td>पक्या इमारतीतील - ०३,</td><td>पक्या इमारतीतील - ०३,</td><td>पक्या इमारतीतील - ०१,</td><td>पक्या इमारतीतील - ०२,</td><td>१४</td></tr>
<tr><td>मोकळ्या जागेतील- ००</td><td>मोकळ्या जागेतील- ००</td><td>मोकळ्या जागेतील- ००</td><td>मोकळ्या जागेतील- १३</td><td>मोकळ्या जागेतील- ०१</td><td>मोकळ्या जागेतील- ०४</td><td>१८</td></tr>
</table>
</td></tr>
<tr><td>ब) शहरामध्ये किती सर्विस सेंटर आहेत त्यामध्ये अधिकृत किती व अनधिकृत किती?</td><td></td><td>
<table>
<tr><th>प्रभाग क्र.१</th><th>प्रभाग क्र.२</th><th>प्रभाग क्र.३</th><th>प्रभाग क्र.४</th><th>प्रभाग क्र.५</th><th>प्रभाग क्र.६</th><th>एकुण</th></tr>
<tr><td>पक्या इमारतीतील - ०२,</td><td>पक्या इमारतीतील - ०१,</td><td>पक्या इमारतीतील - १७,</td><td>पक्या इमारतीतील - ०५,</td><td>पक्या इमारतीतील - ००,</td><td>पक्या इमारतीतील - ०२,</td><td>२७</td></tr>
<tr><td>मोकळ्या जागेतील- ००</td><td>मोकळ्या जागेतील- ००</td><td>मोकळ्या जागेतील- ००</td><td>मोकळ्या जागेतील- ००</td><td>मोकळ्या जागेतील- ००</td><td>मोकळ्या जागेतील- ००</td><td>००</td></tr>
</table>
</td></tr>
</table>

क) शहरामध्ये किती वाहन शोरुम आहेत त्यामध्ये अधिकृत किती व अनधिकृत किती?

| प्रभाग क्र.१ | प्रभाग क्र.२ | प्रभाग क्र.३ | प्रभाग क्र.४ | प्रभाग क्र.५ | प्रभाग क्र.६ | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| पक्या इमारतीतील -०२ | पक्या इमारतीतील -०१ | पक्या इमारतीतील -०६ | पक्या इमारतीतील -१० | पक्या इमारतीतील -०१ | पक्या इमारतीतील -०२ | २२ |
| मोकळ्या जागेतील- ०० | मोकळ्या जागेतील- ०० | मोकळ्या जागेतील- ०० | मोकळ्या जागेतील- ०० | मोकळ्या जागेतील- ०० | मोकळ्या जागेतील- ०० | ०० |

ड) वरील पैकी किती जनांनी मनपाचा परवाना घेतलेला आहे?

| प्रभाग क्र.१ | प्रभाग क्र.२ | प्रभाग क्र.३ | प्रभाग क्र.४ | प्रभाग क्र.५ | प्रभाग क्र.६ | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| ११ | २५ | १६ | ५२ | १५ | ३७ | १५६ |

इ) वरील व्यवसायासाठी प्रती परवाना 10,000.00 प्रमाणे किती परवाना फी मनपाकडे जमा झालेली आहे?

| प्रभाग क्र.१ | प्रभाग क्र.२ | प्रभाग क्र.३ | प्रभाग क्र.४ | प्रभाग क्र.५ | प्रभाग क्र.६ | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| रु.१,७०,०००/- | रु.२,५०,०००/- | रु.१,६०,०००/- | रु.५,८०,०००/- | रु.१,५०,०००/- | रु.१,६०,०००/- | रु.१४,७०,०००/- |

ई) किती व्यवसाय मनपा आरक्षण जागेत आहेत?

| प्रभाग क्र.१ | प्रभाग क्र.२ | प्रभाग क्र.३ | प्रभाग क्र.४ | प्रभाग क्र.५ | प्रभाग क्र.६ | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक | ०७ गॅरेज | निरंक | निरंक | ०७ गॅरेज |

उ) किती व कोणत्या प्रभाग अधिकाऱ्यांनी कोणत्या तात्पुरत्या स्वरुपात परवानगी दि.

| प्रभाग क्र.१ | प्रभाग क्र.२ | प्रभाग क्र.३ | प्रभाग क्र.४ | प्रभाग क्र.५ | प्रभाग क्र.६ | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक |

ऊ) 15 दिवसात परवानगी न घेतलल्या कोणत्या आस्थापनांवर फौजदारी गुन्हा दाखल केलेला आहे?

| प्रभाग क्र.१ | प्रभाग क्र.२ | प्रभाग क्र.३ | प्रभाग क्र.४ | प्रभाग क्र.५ | प्रभाग क्र.६ | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक |

ए) सदर व्यवसाय करणाऱ्यांनी मनपाने रस्ते, पदपथ व इतर मोकळ्या जागेत वाहने उभी करुन मनपाला किती दंडाची रक्कम जमा केली?

| प्रभाग क्र.१ | प्रभाग क्र.२ | प्रभाग क्र.३ | प्रभाग क्र.४ | प्रभाग क्र.५ | प्रभाग क्र.६ | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक |

ऐ) प्रशासनाने सदर ठरावाची अंमलबजावणी केलेला सविस्तर अहवाल काय आहे?

वरील नमूद आस्थापनांकडे परवाना घेतलेला नसेल अशा आस्थापनांचे वाहन दुरुस्ती व इतर साहित्य जप्त करण्याची कारवाई वेळोवेळी करण्यात येत असते. तसेच अनधिकृत आस्थापनावर निष्कासनाची कारवाई प्रशासना मार्फत करण्यात येते.

**४४. श्रीम. कुसुम गुप्ता मा. सदस्या यांनी दि. २२/०४/२०२२ रोजी विचारलेला प्रश्न.**

| प्रश्न | उत्तर |
|---|---|
| १) मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे - गोडदेव सर्व्हे क्र. जुना 225, नविन 188 हिस्सा क्र. 9, 11 या जागेवरील बांधकाम मंजूर नकाशाप्रमाणे असल्यास स्थळ भेट अहवाल आहे किंवा नाही? | विषयांकित जागेवरील बांधकाम मंजूर नकाशाप्रमाणे आहे किंवा नाही याबाबत सद्यस्थितीत संचिकेतील उपलब्ध कागदपत्रांनुसार असा कोणताही अहवाल संचिकेत दिसून येत नाही. तसेच एखादया इमारतीस भोगवटा दाखला मिळणेकामी संबधित वास्तुविशारद / सल्लागार अभियंता यांचेमार्फत या कार्यालयात प्रस्ताव प्राप्त झालेनंतर सदर इमारतीची स्थळ पाहणी करुन बांधकाम मंजूर नकाशाप्रमाणे आहे किंवा कसे याबाबत सदर अहवालात उल्लेख केला जातो. सदरच्या संचिकेवरुन भोगवटा दाखला अद्याप निगर्मित केला नाही. त्यामुळे स्थळभेट अहवाल समाविष्ठ नाही |
| अ) सदर जागेवरील बांधकामास बांधकामाच्या विविध टप्प्यांवर नगररचना विभाग व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभाग यांच्या इमारत निरीक्षक व कनिष्ठ अभियंता यांनी दिलेल्या स्थळ भेट अहवाल आहे किंवा नाही? | **प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क्र.4 :-** सदर जागेवरील बांधकामाची विविध टप्प्यांवर अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभागाचे कनिष्ठ अभियंता यांचेमार्फत पहाणी केलेबाबतची नोंद अभिलेखी आढळून येत नाही. |

| | | |
|---|---|---|
| | | **नगररचना विभाग :-** विषयांकित जागेतील बांधकामच्या विविध टप्प्यांवर नगररचना विभागातील कनिष्ठ अभियंता यांनी दिलेला स्थळ भेट अहवाल मंजूर संचिकेत दिसून येत नाही. तसेच अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभागाकडील माहिती कृपया संबधित प्रभाग कार्यालयात उपलब्ध करुन घ्यावी. |
| ब) सदर जागेवर नियमानुसार फ्रंटेज व सेटबेक डिस्टेन्स, मोकळी जागा, गार्डन, रस्ते, ड्रेनेजसाठी जागा ठेवली आहे किंवा नाही? | | मौजे नवघर स.क्र.118(225)/1,2,3,4,8,9 व 11 186(237)/5,6, 187(298)/2,3 या एकत्रित जागेसाठी जा.क्र. मनपा/नर/327/2020-21 दि.22/06/2020 अन्वये मंजूर केलेल्या सुधारीत नकाशे मंजूरीसह सुधारीत बांधकाम परवानगी पत्राची व नकाशाची छायाप्रत या सोबत विनामूल्य उपलब्ध करुन देत आहे. कृपया त्याचे अवलोकन व्हावे. सदरच्या मंजूर रेखांकनात Front Open Space, Set back Distance, Open Plot, Road, इ. बाबतचा आवश्यक तो तपशिल नमूद आहे. |
| क) सदर जागेवर अग्निशामक नियमानुसार मोकळी जागा सोडली असल्यास त्याचा स्थळ भेट अहवाल आहे किंवा नाही? | | विषयांकित जागेतील इमारत क्र.06 ची उंची 15.00 मी. च्या मर्यादेत असल्याने विकास नियंत्रण नियमावली मधील विनियम क्र. 42 नुसार NBC Chapter-4 मधील तरतुदीनुसार सदर इमारतीस अग्निशमन विभागाकडील नाहरकत दाखल्याची आवश्यकता नाही. |
| ड) मोफा कायदा, 1963 कलम 7 नुसार विकासकाने त्या ले-आऊट मधील इतर गृहनिर्माण संस्था तर्फे नाहरकत दाखला घेतला आहे किंवा नाही? | | सदर मंजूर संचिकेत सादर केलेल्या Consent Letter च्या छायाप्रती या सोबत उपलब्ध करुन देणेत येत आहे. |
| इ) सदर जागेवरील बांधकाम अनधिकृत असल्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, 1949, महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम, 1966 व महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवरक्षक उपाययोजना अधिनियम, 2006 नुसार कारवाई-कार्यवाही केली आहे किंवा नाही? | | **प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क्र.4 :-** सदर जागेवरील बांधकामास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, 1949 महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम 1966 अन्वये नोटीस दिले असल्याचे कार्यालयीन अभिलेखी आढळून येत नाही.<br>**नगररचना विभाग :-** सदर जागेवर अनधिकृत बांधकाम असलेबाबत या कार्यालयाच्या मंजूर संचिकेतील कोणतेही कागदपत्र किंवा नोंद दिसून येत नाही. |
| ई) सदर जागेवरील अनधिकृत बांधकामांवर कारवाई/कार्यवाही करण्यास दिरंगाई करणाऱ्या अधिकारी-कर्मचारी यांची जबाबदारी निश्चित केली आहे किंवा नाही? | | |
| **४५. श्रीम. कुसुम गुप्ता मा. सदस्या यांनी दि. २२/०४/२०२२ रोजी विचारलेला प्रश्न.** | | |
| १) मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे - गोडदेव सर्व्हे क्र. जुना 325, नविन 31 हिस्सा क्र. 15 या जागेवरील बांधकाम मंजूर नकाशाप्रमाणे असल्यास स्थळ भेट अहवाल आहे किंवा नाही? | | **नगररचना विभाग :-** मौजे-गोडदेव येथील स.क्र. 325/4,7,15,16, 31/4,7,15,16 या जागेत महानगरपालिकेने पत्र क्र.मनपा/नर/2671/2009-10 दि.30/10/2009 अन्वये इमारत प्रकार “अे” (स्टिल्ट + 12 मजले) क्षेत्र 2899.55 चौ.मी., इमारत प्रकार “बी” व “सी” (बेसमेंट + तळ + 4 पार्ट मजले) क्षेत्र 1809.00 चौ.मी. व इमारत प्रकार “डी” (तळ + 4 मजले) क्षेत्र 187.53 चौ.मी., |
| अ) सदर जागेवरील बांधकामास बांधकामाच्या विविध टप्प्यांवर नगररचना | | |

| | | |
|---|---|---|
| विभाग व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभाग यांच्या इमारत निरीक्षक व कनिष्ठ अभियंता यांनी दिलेल्या स्थळ भेट अहवाल आहे किंवा नाही? | | जास्तीचे बाल्कनी क्षेत्र 50.01 चौ.मी., जास्तीचे जिन्याचे क्षेत्र 94.45 चौ.मी. व यापूवीच्या मंजूरीनुसार (तळ + 4 मजले) चे अस्तित्वातील क्षेत्र 873.00 चौ.मी. असे एकूण प्रस्तावित बांधकाम क्षेत्र 5913.54 चौ.मी. करीता सुधारीत बांधकाम परवानगी दिलेली आहे.<br>सदर जागेतील इमारत प्रकार “अे” करीता पत्र क्र.मनपा/नर/1040/2013-14 दि.28/06/2013 अन्वये (स्टिल + 12 मजले) चे बांधकाम नकाशानुसार झाल्याने सदर इमारतीस स्थळ निरीक्षणाअंती भाग भोगवटा निर्गमित केलेला आहे.<br>तद्नंतर सदर जागेत पत्र क्र. मनपा/नर/1603/17-18, दि.20/07/2017 अन्वये इमारत प्रकार ‘बी’ व ‘सी’ करीता (बेसमेंट+पार्ट तळ + 7 मजले) क्षेत्र 2904.74 चौ.मी. व इमारत प्रकार ‘डी’ करीता (तळ +3) क्षेत्र 189.61 चौ.मी. असे एकूण 3094.35 चौ.मी. बांधकाम क्षेत्राकरीता सुधारीत बांधकाम परवानगी देण्यात आलेली आहे.<br>तद्नंतर सदर जागेतील इमारत प्रकार “बी” व “सी” करीता दि.27/08/2019 अन्वये भोगवटा दाखला मिळणेबाबत प्रस्ताव प्राप्त झाल्यानुसार सदर इमारतीची पहाणी केली असता, प्रत्यक्ष जागेवर नकाशानुसार बांधकाम झालेले असल्याने पत्र क्र.मनपा/नर/3315/2019-20 दि.13/09/2019 अन्वये भाग भोगवटा दाखला निर्गमित केलेला आहे.<br>तद्नंतर भोगवटा दाखला मिळणेकरीता दि.29/05/2021 रोजी प्रस्ताव प्राप्त झाल्यानुसार जागेवर पाहणी केली असता बांधकाम मंजूर नकाशा झाल्याचे निदर्शनास आल्याने पत्र क्र. मनपा/नर/1690/2021-22, दि.02/09/2021 अन्वये इमारत प्रकार ‘डी’ करीता भोगवटा दाखला देण्यात आलेला आहे.<br>सदर प्रकरणी मंजूर केलेल्या सुधारीत बांधकाम परवानगी, अहवाल व भोगवटा दाखल्याची छायांकित प्रत विनामूल्य या पत्रासोबत उपलब्ध करुन देत आहेत. सदरच्या मंजूर रेखांकनात Front Open Space, Set back Distance, Open Plot, Road, इ. बाबतचा आवश्यक तो तपशिल नमूद केलेला आहे. कृपया त्याचे अवलोकन व्हावे.<br>**प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क्र.4 :-** सदर जागेवरील बांधकामाची विविध टप्प्यांवर अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभागाचे कनिष्ठ अभियंता यांचेमार्फत पहाणी केलेबाबतची नोंद अभिलेखी आढळून येत नाही. |
| ब) सदर जागेवर नियमानुसार फ्रंटेज व सेटबेक डिस्टेन्स, मोकळी जागा, गार्डन, रस्ते, ड्रेनेजसाठी जागा ठेवली आहे किंवा नाही? | | |
| क) सदर जागेवर अग्निशामक नियमानुसार मोकळी जागा सोडली असल्यास त्याचा स्थळ भेट अहवाल आहे किंवा नाही? | | विषयांकित जागेतील प्रस्तावित इमारत प्रकार ‘बी’ व ‘सी’ इमारतीकरीता मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागामार्फत स्थळपहाणी करून पत्र क्र. मनपा/अग्नि/1029/2015-16 दि.23/12/2015 अन्वये तात्पुरता नाहरकत दाखला व तद्नंतर पत्र क्र. मनपा/अग्नि/1403/2018-19 दि.02/03/2019 अन्वये अंतिम नाहरकत दाखला दिलेला आहे. |
| ड) मोफा कायदा, 1963 कलम 7 नुसार विकासकाने त्या ले-आऊट मधील | | मौजे-गोडदेव येथील स.क्र. 325/4,7,15,16, 31/4,7,15,16 जागेतील प्रकल्प दि.07/09/2017 |

| | | |
|---|---|---|
| इतर गृहनिर्माण संस्था तर्फे नाहरकत दाखला घेतला आहे किंवा नाही? | | अन्वये महारेरा क्र.P51700012653 अन्वये नोंदणीकृत असल्याने सदर प्रकल्पास मोफा कायदा लागू होत नाही. सोबत त्याची छायाप्रत विनामूल्य उपलब्ध करुन देण्यात येत आहे. |
| इ) सदर जागेवरील बांधकाम अनधिकृत असल्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, 1949, महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम, 1966 व महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवरक्षक उपाययोजना अधिनियम, 2006 नुसार कारवाई-कार्यवाही केली आहे किंवा नाही?<br>ई) सदर जागेवरील अनधिकृत बांधकामांवर कारवाई/कार्यवाही करण्यास दिरंगाई करणाऱ्या अधिकारी-कर्मचारी यांची जबाबदारी निश्चित केली आहे किंवा नाही? | | **नगररचना विभाग :-**<br>सदर जागेवर अनधिकृत बांधकाम असलेबाबत या कार्यालयाच्या मंजूर संचिकेतील कोणतेही कागदपत्र किंवा नोंद दिसून येत नाही. सबब सदर प्रकरणी या कार्यालयाने भोगवटा दाखला निर्गमित केल्यानंतर झालेल्या अनधिकृत बांधकामा संदर्भात माहिती आवश्यक असल्यास याबाबत कृपया प्रभाग समिती क्र.04 यांचेकडून उपलब्ध करुन घ्यावी.<br>**प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क्र.4 :-** सदर जागेवरील बांधकामास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, 1949 महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम 1966 अन्वये नोटीस दिले असल्याचे कार्यालयीन अभिलेखी आढळून येत नाही. |
| **४६. श्रीम. कुसुम गुप्ता मा. सदस्या यांनी दि. २२/०४/२०२२ रोजी विचारलेला प्रश्न.** | | |
| १) मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे - गोडदेव सर्व्हे क्र.31/4,7,15,16 (नविन) 325/4,7,15,16 (जुना) या जागेवरील बांधकाम मंजूर नकाशाप्रमाणे असल्यास स्थळ भेट अहवाल आहे किंवा नाही?<br>अ) सदर जागेवरील बांधकामास बांधकामाच्या विविध टप्प्यांवर नगररचना विभाग व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभाग यांच्या इमारत निरीक्षक व कनिष्ठ अभियंता यांनी दिलेल्या स्थळ भेट अहवाल आहे किंवा नाही?<br>ब) सदर जागेवर नियमानुसार फ्रंटेज व सेटबेक डिस्टेन्स, मोकळी जागा, गार्डन, रस्ते, ड्रेनेजसाठी जागा ठेवली आहे किंवा नाही? | | **नगररचना विभाग -** मौजे-गोडदेव येथील स.क्र. 325/4,7,15,16, 31/4,7,15,16 या जागेत महानगरपालिकेने पत्र क्र.मनपा/नर/2671/2009-10 दि.30/10/2009 अन्वये इमारत प्रकार “अे” (स्टिल्ट + 12 मजले) क्षेत्र 2899.55 चौ.मी., इमारत प्रकार “बी” व “सी” (बेसमेंट + तळ + 4 पार्ट मजले) क्षेत्र 1809.00 चौ.मी. व इमारत प्रकार “डी” (तळ + 4 मजले) क्षेत्र 187.53 चौ.मी., जास्तीचे बाल्कनी क्षेत्र 50.01 चौ.मी., जास्तीचे जिन्याचे क्षेत्र 94.45 चौ.मी. व यापूवीच्या मंजूरीनुसार (तळ + 4 मजले) चे अस्तित्वातील क्षेत्र 873.00 चौ.मी. असे एकूण प्रस्तावित बांधकाम क्षेत्र 5913.54 चौ.मी. करीता सुधारीत बांधकाम परवानगी दिलेली आहे.<br>सदर जागेतील इमारत प्रकार “अे” करीता पत्र क्र.मनपा/नर/1040/2013-14 दि.28/06/2013 अन्वये (स्टिल + 12 मजले) चे बांधकाम नकाशानुसार झाल्याने सदर इमारतीस स्थळ निरीक्षणाअंती भाग भोगवटा निर्गमित केलेला आहे.<br>तद्नंतर सदर जागेत पत्र क्र. मनपा/नर/1603/17-18, दि.20/07/2017 अन्वये इमारत प्रकार ‘बी’ व ‘सी’ करीता (बेसमेंट+पार्ट तळ + 7 मजले) क्षेत्र 2904.74 चौ.मी. व इमारत प्रकार ‘डी’ करीता (तळ +3) क्षेत्र 189.61 चौ.मी. असे एकूण 3094.35 चौ.मी. बांधकाम क्षेत्राकरीता सुधारीत बांधकाम परवानगी देण्यात आलेली आहे.<br>तद्नंतर सदर जागेतील इमारत प्रकार “बी” व “सी” करीता दि.27/08/2019 अन्वये भोगवटा दाखला मिळणेबाबत प्रस्ताव प्राप्त झाल्यानुसार सदर इमारतीची पहाणी केली असता, प्रत्यक्ष जागेवर नकाशानुसार बांधकाम झालेले असल्याने पत्र क्र.मनपा/नर/3315/2019-20 दि.13/09/2019 अन्वये भाग भोगवटा दाखला निर्गमित केलेला आहे. |

| | | |
|---|---|---|
| | | तद्नंतर भोगवटा दाखला मिळणेकरीता दि.29/05/2021 रोजी प्रस्ताव प्राप्त झाल्यानुसार जागेवर पाहणी केली असता बांधकाम मंजूर नकाशा झाल्याचे निदर्शनास आल्याने पत्र क्र. मनपा/नर/1690/2021-22, दि.02/09/2021 अन्वये इमारत प्रकार 'डी' करीता भोगवटा दाखला देण्यात आलेला आहे.<br>सदर प्रकरणी मंजूर केलेल्या सुधारीत बांधकाम परवानगी, अहवाल व भोगवटा दाखल्याची छायांकित प्रत विनामूल्य या पत्रासोबत उपलब्ध करुन देत आहेत. सदरच्या मंजूर रेखांकनात Front Open Space, Set back Distance, Open Plot, Road, इ. बाबतचा आवश्यक तो तपशिल नमूद केलेला आहे. कृपया त्याचे अवलोकन व्हावे.<br>**प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क्र.4 :-** सदर जागेवरील बांधकामाची विविध टप्प्यांवर अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभागाचे कनिष्ठ अभियंता यांचेमार्फत पहाणी केलेबाबतची नोंद अभिलेखी आढळून येत नाही. |
| क) सदर जागेवर अग्निशामक नियमानुसार मोकळी जागा सोडली असल्यास त्याचा स्थळ भेट अहवाल आहे किंवा नाही? | | विषयांकित जागेतील प्रस्तावित इमारत प्रकार 'बी' व 'सी' इमारतीकरीता मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागामार्फत स्थळपहाणी करून पत्र क्र. मनपा/अग्नि/1029/ 2015-16 दि.23/12/2015 अन्वये तात्पुरता नाहरकत दाखला व तद्नंतर पत्र क्र. मनपा/अग्नि/1403/2018-19 दि.02/03/2019 अन्वये अंतिम नाहरकत दाखला दिलेला आहे. |
| ड) मोफा कायदा, 1963 कलम 7 नुसार विकासकाने त्या ले-आऊट मधील इतर गृहनिर्माण संस्था तर्फे नाहरकत दाखला घेतला आहे किंवा नाही? | | मौजे-गोडदेव येथील स.क्र. 325/4,7,15,16, 31/4,7,15,16 जागेतील प्रकल्प दि.07/09/2017 अन्वये महारेरा क्र.P51700012653 अन्वये नोंदणीकृत असल्याने सदर प्रकल्पास मोफा कायदा लागू होत नाही. सोबत त्याची छायाप्रत विनामूल्य उपलब्ध करुन देण्यात येत आहे. |
| इ) सदर जागेवरील बांधकाम अनधिकृत असल्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, 1949, महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम, 1966 व महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवरक्षक उपाययोजना अधिनियम, 2006 नुसार कारवाई-कार्यवाही केली आहे किंवा नाही? | | **नगररचना विभाग :-** सदर जागेवर अनधिकृत बांधकाम असलेबाबत या कार्यालयाच्या मंजूर संचिकेतील कोणतेही कागदपत्र किंवा नोंद दिसून येत नाही. सबब सदर प्रकरणी या कार्यालयाने भोगवटा दाखला निर्गमित केल्यानंतर झालेल्या अनधिकृत बांधकामा संदर्भात माहिती आवश्यक असल्यास याबाबत कृपया प्रभाग समिती क्र.04 यांचेकडून उपलब्ध करुन घ्यावी.<br>**प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क्र.4 :-** सदर जागेवरील बांधकामास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, 1949 महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम 1966 अन्वये नोटीस दिले असल्याचे कार्यालयीन अभिलेखी आढळून येत नाही. |
| ई) सदर जागेवरील अनधिकृत बांधकामांवर कारवाई/कार्यवाही करण्यास दिरंगाई करणाऱ्या अधिकारी-कर्मचारी यांची जबाबदारी निश्चित केली आहे किंवा नाही? | | |

**(संभाजी पानपट्टे)**
**अति. आयुक्त**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**